२६/८/९८

### तेजस्विनी पोवार

*कोल्हापूर, दि. २५*



कमला कॉलेजच्या विद्यार्थी संसद सचिवपदी कु. तेजस्विनी पोवार हिची निवड झाली. संसदेच्या अध्यक्षपदी प्राचार्य क्रांतीकुमार पाटील राहतील.

या संसदेच्या सदस्यपदी गुणवत्तेनुसार कु. नंदाताई गायकवाड (बी. ए-१), कु. प्रतिक्षा देऊडकर (बी. ए.-२), कु. अर्चना महाडेश्वर (बी. ए.-३), कु. अस्मिता कोरे (बी. कॉम.-१), कु. शीतल शिंदे (बी. कॉम-२), यांची निवड झाली. कु. वर्षा जाधव (एन. एस. एस.), कु. पद्मश्री बागवडेकर यांची सांस्कृतिक विभागामधून कु. सीमा गावडे यांची एन. सी. सी. प्रतिनिधी म्हणून निवड झाली. प्राचार्य नियुक्त सदस्य म्हणून कु. मनिषा गुरव, कु. तेजस्विनी आकोळकर यांची निवड झाली. संसद सचिव कु. तेजस्वीनी पोवार या क्रीडाप्रतिनिधीही आहेत. या निवडी प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाल्या.

२६/८/९८

## कमला कॉलेजमध्ये संगणक केंद्राचे उद्घाटन

*कोल्हापूर, दि. २५*

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या संगणक प्रशिक्षक केंद्राचे उद्घाटन कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना प्राचार्य पाटील यांनी काळाची गरज ओळखून महाविद्यालयाने संगणक प्रशिक्षक केंद्र सुरू केले आहे. अभ्यासक्रमातही संगणकाचा समावेश करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी या केंद्राचा फायदा घेऊन आपला विकास साधावा. संगणक अभ्यासक्रम विभागाचे प्रमुख प्रा. एन. व्ही. पवार यांनी या केंद्राची माहिती दिली.

सकाळ 8/8/99

### तेजस्विनी पोवार यांची निवड

कोल्हापूर, ता. ७ : येथील कमला महाविद्यालयाच्या विद्यार्थी मंडळाच्या सचिवपदी तेजस्विनी पोवार यांची निवड झाली.

समितीच्या क्रीडा विभागप्रमुख- पोवार, एन.एस.एस.- वर्षा शिवाजी जाधव, एन.सी.सी.- सीमा पांडुरंग गावडे, सांस्कृतिक विभाग- पद्मश्री सुरेश बागडेकर, तसेच वर्गप्रतिनिधी- नंदाताई गायकवाड, प्रतीक्षा देऊडकर, अर्चना महाडेश्वर, अस्मिता कोरे, शीतल शिंदे, दीपाली सुतार, मनीषा गुरव, तेजस्विनी अकोळकर यांची निवड झाली.

24/8/99

## डॉ. व्ही. टी. पाटील जन्म शताब्दी समारोह समितीची स्थापना

*कोल्हापूर दि. २३*

ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठाचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची सोमवार दिनांक १६ ऑगस्ट ९९ रोजी जन्मशताब्दी वर्षास सुरवात होत आहे. त्यानिमित्त संस्थेचे कार्य. अध्यक्ष रामराव बेनाडीकर, कार्य. अध्यक्ष, प्राचार्य रा. कृ. कणबरकर व संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी नुकतीच एक व्यापक बैठक घेतली.

या बैठकीमध्ये जन्मशताब्दी समारोह समितीची स्थापना करण्यात आली.

या समितीमध्ये काकाजींचे हितचिंतक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश आहे. काकाजींच्या जन्मशताब्दीचा निमित्त या समितीमार्फत वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.